बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि १५ सप्टेंबर २०२३

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२२/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ११/०९/२०२३ रोजी १०.०० वा ते १८.३० वा चे दरम्यान नवीन बी ब्लॉक सिव्हील हॉस्पीटल सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०९/२०२३ रोजी ०१.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दिपक मल्लिनाथ पवार,वय-२६,रा- खुर्द लमान तांडा ता.मोहोळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २०,०००/- रू ची काळया रंगाची हिरो पॅशन प्रो मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्रएमएच १३ बी यु ९६२१ ही वरील ठिकाणी पार्क करून हॅन्ड लॉक केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या समंतीवाचून फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास-पोह/३६८/मोरे- |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२२/२०२३ भादवि ३२७,३२४,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०९/२०२३ रोजी २०.२० व चे सुमारास रूपाभवानी मंदिर पाणी गिरणीसमोर लाईटच्या खांबा जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०९/२०२३ रोजी २१.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | समर्थ राजकुमार माशाळकर,वय-२३ वर्षे,रा- १०० गांधी नगर नं ६ अ.कोट रोड एमआयडीसी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) ओम ऊर्फ शिवम भोसले,२)ओकार मोहिते, ३) सॅम भोसले व त्यांचे तीन अनोळखी साथीदार. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे देवीचे दर्शन घेवून त्यांची वेस्पा गाडीवरून घरी जात असताना नमुद ठिकाणी एका अनोळखी इसमाने हात केल्याने फिर्यादी थांबले असता यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी गेल्यावर्षी गणपती विसर्जन मिरवणुकीत झालेल्या भांडणाचा कारणावरून फिर्यादीस हाताने लाथाबुक्यांनी लोखंडी रॉडने लाकडी बाबू व हॉकिस्टीने फिर्यादीचे डोक्यात उजव्या कानाजवळ पाठीत व हातावर मारहाण शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देवून आरोपी क्र २ याने फिर्यादीचे उजवे कानातील एक ग्रॅमचे बाली ५०००/- रू ची काढून घेतली व आरोपी क्र १ याने फिर्यादीचे गळयातील दोन तोळे वजानाचे सोन्याचे लॉकेट १,००,०००/- रू कि ओढून काढून घेतले आहे.म्हणून.तपास-सपोनि जाधव- **९८५०९७५९२०** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५६/२०२३ भादवि ३२३,३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०९/२०२३ रोजी १९.३० वा. चे सुमारास वालचंद कॉलेज समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०९/२०२३ रोजी ००.५९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | ओकार संयजसिंग रजपूत वय-२५ वर्षे,रा- सिध्दरामेश्वर नगर भाग-१ एमआयडीसी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अनिल शिंदे,२) दादा भोसले,३) सागर बेळमकर,सर्व रा- सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे मोटार सायकलला कट मारल्याने फिर्यादीने आरोपी मजकूर यांना कट कशाला मारला असे विचारले असता आरोपी क्र १ याने फिर्यादीस शिवीगाळ करून कोयत्याने हातावर मारले तसेच आरोपी क्र २ व ३ यांनी हाताने व लाथाबुक्यांनी संपुर्ण अंगावर मारले तसेच जिवे ठार मारण्याचा धमकी दिली आहे.म्हणून.तपास-पोह/१२०३-जाधव- |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५२/२०२३ भादवि २७९,३३६,३३७,३३८ सह मोवा का १८४प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०९/२०२३ रोजी १४.०० वा चे सुमारास बाळे ब्रिज येथे बाळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०९/२०२३ रोजी २३.०४ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | गणेश प्रभाकर भांडेकर,वय-३० वर्षे,रा- अंबिका नगर बाळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | विनायक संदिपान क्षीरसागर वय-४३ वर्षे,रा- वसंत नगर जुळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्यांची मो.सा.क्र एमएच १३ डीसी ६२३८ यावरून मित्र निखील गायकवाड व मुलगी वैष्णवी वय-४ यांचेसह सर्व्हिस रोडने येत असताना नमुद ठिकाणी आले असता पुणेच्या दिशेने येणारी इनिव्हा कार क्र एमएच १३ डीएम ६१७४ ही भरधाव वेगात येवून फिर्यादीचे मो.सायकलीस धडक दिल्याने त्यात फिर्यादीचे डाव्या पायाला तोंडाला होटाला मार लागला तसेच मित्र निखील यास जांगेत मार लागला आहे व मुलगी वैष्णवी हिस डोक्याला गळयाला व पोटाला मार लागून गंभीर जखमी केले आहे तसेच नमुद आरोपी मजकूर याने फिर्यादीस सिध्देश्वर हॉस्पीटल येथे उपचारास दाखल केले आहे.म्हणून.तपास-पोह/११८६/घुगे- ७५०७४४४२२२ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५१/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०६/२०१५ ते दि २९/०६/२०२३ रोजी फिर्यादीचे सासरी सासवड पुणे |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०९/२०२३ रोजी २१.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजश्री प्रशांत थोरात,वय-३६ वर्षे,रा- ३२६,मुरारजी पेठ लोभा मास्तर चाळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रशांत थोरात (पती),२) रेखा थोरात (सासू),३) दिपक थोरात (सासरे), ४) मिनाक्षी घाडवे (नणंद), रा श्री सदगुरू सदर म.फुले चौक भापकर कॉर्नर जवळ खंडोबा नगर बारामती जि.पुणे,५) तृप्ती सागर निखुडे (नणंद)रा सासवड पुणे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही सासरी नांदण्यास असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी मिळून फिर्यादीस तुम्ही लग्नात चांगले मानपान केले नाही चांगला हुंडा दिला नाही जास्त साहित्य दिले नाही तु मोलकरीन सारखे रहायचे तुम्ही दरिद्रय लोक आहात तुमच्या मुलीला आम्ही नांदवणार नाही आमचे बारामती येथील जुने घर आहे ते पाडून नवीन बंगला बांधायचे आहे त्याकरीता १० लाख रूपये घेवून या तरच तुमच्या मुलीस नांदण्यास घेवू फिर्यादीस माहेरून १० लाख रूपये घेवून ये असे सांगितले होते परंतु तु आमचे ऐकत नाही व १० लाख रूपये दया म्हणून सांगितले होते तुम्ही नवीन घर बांधण्यास काही एक हातभार लावला नाही असे म्हणून वेळोवेळी मारहाण शिवीगाळ दमदाटी करून फिर्यादीचा जाचहाट छळ केला आहे.म्हणून.तपास-पोह/१५७२/दराडे-९८५०५५१५७२ |